# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

## (खुद्द)

## मंत्रालय, मुंबई

# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाची व्याप्ती



- शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक, नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालये आणि रुग्णालयांवर प्रशासकीय नियंत्रण.
- 22 वैद्यकीय महाविद्यालये आणि 20228 खाटांच्या माध्यमातून राज्यभर तृतीयक आरोग्य सेवा (Tertiary Care Service) प्रदान करणे.
- विविध खाजगी वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक आणि नर्सिंग महाविद्यालयांवर नियंत्रण आणि नियमन.
- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, महाराष्ट्र मेडिकल परिषद, महाराष्ट्र दंत परिषद, महाराष्ट्र नर्सिंग परिषद, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, इत्यादी विविध परिषदा आणि संस्थांवर प्रशासकीय नियंत्रण.
- वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशाबाबत राज्य सीईटी सेलशी समन्वय.

# आस्थापना



- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील (खुद्द) कामकाज एकूण 20 कार्यासनांमार्फत हाताळण्यात येते. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या (खुद्द) मंजूर आकृतीबंधानुसार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अनु. क्र. | संवर्ग | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1. | सचिव | 01 | 01 | 0 |
| 2. | सह सचिव/उप सचिव | 05 | 05 | 0 |
| 3. | अवर सचिव | 06 | 05 | 01 |
| 4. | कक्ष अधिकारी | 12 | 08 | 04 |
| 5. | लेखा अधिकारी/सहा.लेखा अधिकारी | 02 | 02 | 00 |
| 6. | निवड/उच्च/निम्नश्रेणी लघुलेखक/लघु टंकलेखक | 14 | 07 | 07 |
| 7. | सहायक कक्ष अधिकारी | 37 | 30 | 07 |
| 8. | लिपिक-टंकलेखक | 37 | 30 | 07 |
| 9. | शिपाई/वाहन चालक/नाईक | 13 | 05 | 08 |
| | **एकूण** | **127** | **93** | **32** |

# आस्थापना (खुद्द)



वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग खुद्द (अंतर्गत)

- सर्व संवर्गाच्या आस्थापना व सेवाविषयक बाबी
- प्रशासकीय, व्यवस्थापकीय व जनसंपर्क बाबी.
- विविध अग्रीमांचे वाटप, खर्चाचा ताळमेळ घालणे
- नोंदणी, निंदणी, रोखशाखा, टंकलेखन शाखा, यांचे कार्यावर नियंत्रण ठेवणे.
- ज्येष्ठता याद्या, सेवाप्रवेश नियम, पदांची मानके

# वैसेवा-1/2/3



- अ) राज्यातील एकूण 22 शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये तसेच 04 अतिविशेषोपचार रुग्णालये यांच्या आस्थापनेवरील गट-अ व गट-ब मधील अध्यापकांच्या / अधिकाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी या कार्यासनांकडून हाताळल्या जातात.

# गट-अ व गट-ब संवर्गाची सध्याची पदस्थिती खालीलप्रमाणे आहे.



| अ.क्र. | सवंर्ग | मंजूर पदसंख्या | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदोन्नती | सरळसेवा | एकूण | पदोन्नती | सरळसेवा | एकूण | पदोन्नती | सरळसेवा | एकूण |
| 1 | आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण व आयुष) भा.प्र.से. | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 2 | संचालक, गट-अ | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 3 | सह संचालक, गट-अ | 3 | 2 | 5 | 1 | 0 | 1 | 2 | 2 | 4 |
| 4 | अधिष्ठाता, गट-अ | 12 | 11 | 23 | 8 | 4 | 12 | 4 | 7 | 11 |
| 5 | प्राध्यापक, गट-अ | 252 | 237 | 490 | 203 | 119 | 322 | 49 | 119 | 168 |
| 6 | सहयोगी प्राध्यापक, गट-अ | 571 | 555 | 1126 | 527 | 394 | 921 | 44 | 161 | 205 |
| 7 | सहायक प्राध्यापक, गट-ब | 0 | 1765 | 1765 | 0 | 955 | 955 | 0 | 810 | 810 |
| 8 | मुख्य प्रशासकीय अधिकारी, गट-अ | 11 | 11 | 22 | 10 | 2 | 12 | 1 | 9 | 10 |
| 9 | वैद्यकीय अधिक्षक, गट-अ | 12 | 11 | 23 | 0 | 0 | 0 | 12 | 11 | 23 |
| 10 | वैद्यकीय अधिकारी, गट-अ | - | - | 85 | - | - | 0 | - | - | 85 |
| 11 | वैद्यकीय अधिकारी, गट-ब | 0 | 429 | 429 | 0 | 0 | 0 | 0 | 429 | 429 |
| 12 | प्रशासकीय अधिकारी, गट-ब | 37 | 36 | 73 | 18 | 10 | 28 | 19 | 26 | 45 |
| 13 | औषधनिर्माता, गट-ब | 0 | 22 | 22 | 0 | 10 | 10 | 0 | 12 | 12 |
| 14 | जीवरसायनशास्त्रज्ञ, गट-ब | 12 | 36 | 48 | 0 | 18 | 18 | 12 | 18 | 30 |

- गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण 1701 पदांबाबत आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून गट-अ मधील 129 व गट-ब मधील 72 उमेदवारांच्या शिफारशी शासना प्राप्त झाल्या असून त्यापैकी गट-अ मधील 43 व गट-ब मधील 60 उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. उर्वरित उमेदवारांबाबत कागदपत्र तपासणी करुन पदस्थापना देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
- गट-अ व गट-ब संवर्गातील सामान्य प्रशासन विभागास सादर केलेल्या 316 प्रस्तावांपैकी 243 पदांच्या शिफारशी प्राप्त झाल्या असून पदस्थापना देण्यात आली आहे. आस्थापना मंडळ क्रमांक 01 ने शिफारस केलेल्या 28 पदांना पदस्थापना प्रस्तावित केली आहे. तसेच आस्थापन मंडळ क्रमांक 02 कडे 10 पदांचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर केला आहे.

- वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने शासन आदेश दि.06/10/2021 अन्वये आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व आयुष) हे भा.प्र.से. संवर्गातील पद तसेच गट-अ व गट-ब मधील 33 पदे तसेच प्रादेशिक स्तरावर सह संचालक यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाकरीता गट-अ व गट-ब मधील 28 पदे निर्माण करण्यात आली आहेत.
- प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, यवतामळ, अकोला व लातूर येथे अतिविशेषोपचार रुग्णालये सुरु करण्यात आली असून शासन आदेश दि.08/01/2021 अन्वये प्रथम टप्प्याकरीता 888 पदे निर्माण करण्यात आली आहेत. उर्वरित 02 टप्प्यांकरीता एकूण 1207 पदे निर्माण करण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागामार्फत मंत्रिमंडळ विचारार्थ सादर.
- शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकीय पदे व अधिष्ठाता तसेच संचालनालयातील संचालक व सह संचालक या संवर्गांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार 7 व्या वेतन आयोगाच्या तरतूदी शासन निर्णय दिनांक 13.09.2019 अन्वये लागू करण्यात आल्या आहेत. तसेच ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण निर्देशक या पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार 7 व्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करणेबाबत दिनांक 27.09.2022 रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत प्रस्ताव मान्य.
- शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकीय पदे व अधिष्ठाता तसेच संचालनालयातील संचालक व सह संचालक या संवर्गांना व्यवसायरोध भत्ता व अन्य भत्ते तसेच अध्यापकीय पदांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम शासन निर्णय दिनांक 12.04.2022 अन्वये लागू करण्यात आले आहेत. तसेच संचालनालयाच्या अधिनस्त विविध महाविद्यालयांकरिता तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे तसेच विविध उपाययोजना सुचविण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण ) अधिनियम 2021 नुसार अध्यापकीय पदांबाबत संवर्गनिहाय आरक्षण निश्चित करणे आवश्यक आहे. शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील पदभरती बाबत पूर्वी प्रमाणे विषयनिहाय आरक्षण ठेवणे प्रशासकीय दृष्टया आवश्यक असल्याने अधिनियमातील कलम ४ (ख) मधील तरतूदीनुसार सदर महाविद्यालये, परिचर्या महाविद्यालये व मानसिक आरोग्य संस्था या संस्थाना संशोधन संस्था म्हणून घोषीत करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याबाबत नस्ती विधी व न्याय विभागास सादर केली आहे.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील चिकित्सालयीन व अतिविशेषीकृत विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या वरिष्ठ अध्यापकीय संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरली जावीत यासाठी या पदांच्या मानधनात अनुक्रमे रु. 50,000/- व रु.40,000/- हून रु.1,85,000-2,30,000 व रु.1,70,000/- ते 2,10,000/- इतकी वाढ दि.09/02/2022 च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.
- दुर्गम व दुरस्थ व निमशहरी भागात स्थापन झालेल्या व नव्याने स्थापन होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची गट-अ व गट-ब संवर्गातील पदभरती संस्थानिहाय स्वतंत्ररीत्या 100 टक्के सरळसेवेने करण्यास दि.06/08/2021 च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे.

- राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार आवश्यक असलेली वरिष्ठ निवासी संवर्गातील एकूण 1432 पदे सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या आस्थापनेवर निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव सचिव उपसमितीच्या विचारार्थ सादर केला आहे व तद्नंतर मंत्रिमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- अतिविशेषोपचार विषयातील अध्यापकीय पदांची संस्थानिहाय व विषयनिहाय पुर्नरचना करुन तसेच सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक संवर्गातील 14 पदे निर्माण करुन या विषयातील पदव्युत्तर पदवी विद्यार्थीसंख्या 137 हून 209 इतकी वाढविण्याबाबतचा प्रस्ताव सचिव उपसमितीच्या विचारार्थ सादर केला आहे व तद्नंतर मंत्रिमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- शासकीय वैदयकीय महाविद्यालयातील सरळसेवेच्या कोट्यातील डॉक्टरांची शैक्षणिक व अशैक्षणिक पदे तसेच रुग्णसेवेशी संबंधित गट-अ ते गट-क मधील तांत्रिक पदे भरण्यासाठी महाराष्ट्र वेद्यकीय सेवा आयोग हा स्वतंत्र समर्पित आयोग अधिनियमाव्दारे स्थापित करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

# वैसेवा-४



1) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-1 ते वर्ग-4 पर्यंतच्या सर्व संवर्गांच्या आस्थापनाविषयक बाबी
2) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-3 तांत्रिक/ अतांत्रिक व वर्ग-4 संवर्गाच्या सेवाविषयक बाबी या कार्यासनाकडून हाताळल्या जातात.
3) वर्ग-3 बाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे नियुक्ती प्राधिकारी आहेत.
4) अधिष्ठाता हे वर्ग-4 संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी आहेत
5) वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाच्या संदर्भात नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकार कक्षेत नसलेले सर्व प्रकरणे शासनस्तरावरुन हाताळले जातात.
6) महाराष्ट्रामध्ये एकुण 3 शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय आहेत ती पुढीलप्रमाणे

अ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

आ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

इ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

दंत महाविद्यालय व रुग्णालयामध्ये एकुण 10 विषयाचा समावेश आहे. दंत/वैद्यकीय महाविद्यालयातील (दंत विषयातील) पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | मंजुर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | सह संचालक (दंत) | 01 | 01 | 00 |
| 2 | अधिष्ठाता | 03 | 02 | 01 |
| 3 | प्राध्यापक | 45 | 27 | 18 |
| 4 | सहयोगी प्राध्यापक | 82 | 53 | 29 |
| 5 | सहायक प्राध्यापक | 124 | 50 | 74 |
| 6 | दंतशल्यचिकित्सक | 52 | 41 | 11 |
| 7 | एकूण | 307 | 174 | 133 |

- शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुगालयातील वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | संवर्ग | मंजुर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्ग-3 तांत्रिक | 4264 | 2551 | 1713 |
| 2 | वर्ग-3 अतांत्रिक | 3054 | 1830 | 1224 |
| 3 | वर्ग-4 | 9543 | 5656 | 3887 |
| 4 | एकूण | 16861 | 10037 | 6824 |

- **ब) बाह्यस्त्रोतामार्फत पदे भरण्याबाबत:-**
- वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सरळसेवेने पदे भरेपर्यंतच्या कालावधीत रुग्णसेवा बाधित होऊ नये याकरीता वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिनस्थ वर्ग-3 संवर्गातील 2368 व वर्ग-4 संवर्गातील 1911 तसेच आयुष संचालनालय यांच्या अधिनस्थ वर्ग-3 संवर्गातील 166 अशी एकुण 4445 पदे भरण्यास अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने मान्यता दिली होती. त्यानुसार दि. 13.4.2022 च्या पत्रान्वये बाहयस्त्रोताद्वारे पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**क) वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील पदांचे सुनिश्चितीकरण:**

- वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्थ असलेल्या महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-1 व वर्ग-2 च्या संवर्गाकरिता राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेने मानके निश्चित केली आहेत. तथापि वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाकरिता अशी मानके निश्चित करण्यात आलेली नाहीत. तसेच, अनेक संस्थाकरिता पुर्वी मंजूर करण्यात आलेली वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाची पदे पुरेशी नसल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुग्णालयामधील वाढती विद्यार्थी संख्या व रुग्णसंख्या विचारात घेता, तसेच, अद्ययावत यंत्रसामग्रीचा वाढता वापर विचारात घेता वर्ग-3 तांत्रिक / अतांत्रिक, अधिपरिचारिका व वर्ग-4 संवर्गातील पदे पुरेशी नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सर्व संस्थांमधील वर्ग-3 (तांत्रिक / अतांत्रिक) अधिपरिचारिका व वर्ग-4 मधील पदांची संख्या निश्चित करुन या संवर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- **सुरु असलेले महत्त्वाचे कामकाज :**
-
- **अ) पदभतीबाबत:**
- सामान्य प्रशासन विभागाच्या दि.04.05.2022 च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनांनुसार या विभागाच्या अधिनस्थ असलेल्या वर्ग-3 संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्याकरिता दि.23.06.2022 रोजी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.
- विभागाच्या अखत्यारीतील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,अन्न व औषध प्रशासन, आयुष संचालनालय व मानसिक आरोग्य संस्थेच्या अधिपत्याखालील वर्ग-3 ची तांत्रिक/अतांत्रिक संवर्गाची व परिचर्या संवर्गातील, तसेच वर्ग-4 ची अशी एकूण साधारण 7500 सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
- प्रस्तुत प्रकरणी संस्थेची निवड करण्याकरिता Request for proposal साठी शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्याकरिता नस्ती दि.02.09.2022 रोजी सादर करण्यात आली आहे.

## ड) दंत विषयातील अध्यापकांचे सेवाप्रवेश नियम

- दंत विषयातील अध्यापकांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु असून सदर सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मार्च, 2021 मध्ये सादर करण्यात आले आहेत. त्यानंतर मा. आयोगाने वेळावेळी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने पुर्तता करण्यात आली असली तरी सेवाप्रवेश नियमास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सदर सेवाप्रवेश नियमा अभावी अध्यापकीय संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.
- सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई येथील बदली कामगारांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात मुळ अर्ज क्र-756/2020 दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि.14.02.2022 च्या आदेशान्वये मुळ अर्ज मान्य केला. सदर आदेशाविरुध्द शासनाच्या वतीने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.10793/2022 दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.14.09.2022 च्या आदेशान्वये मा. न्यायाधिकरणाच्या आदेशास स्थगिती दिली असून पुढील सुनावणी दि.12.10.2022 रोजी आहे.

# परिचर्या



- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखाली 6 परिचर्या महाविद्यालये व 10 जी.एन.एम. अभ्यासक्रमाच्या संस्था आहेत. सदर परिचर्या महाविद्यालये व संस्थांमध्ये शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम व विद्यार्थीक्षमता खालीलप्रमाणे आहे :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महाविद्यालयांमध्ये शिकविले जाणारे अभ्यासक्रम | जी.एन. एम. | बी.ए स्सी. | एम.एस्सी . | पी.बी. बी.एस्सी. | पी.बी. पेडीयाट्रीक |
| 2 | किती महाविद्यालयांमध्ये सदर अभ्यासक्रम शिकविले जातात | 10 | 5 | 2 | 1 | 1 |
| 3 | विद्यार्थीक्षमता | 212 | 250 | 50 | 60 | 20 |

- परिचर्या संवर्गातील अध्यापकीय संवर्गाची पदस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्ग 1 | 22 | 0 | 22 |
| 2 | वर्ग 2 | 19 | 10 | 9 |
| 3 | वर्ग 3 | 134 | 92 | 42 |
| | **एकूण** | **175** | **102** | **73** |

# परिचर्या संवर्गातील शुश्रूषा सेवेतील संवर्गाची पदस्थिती



| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | **वर्ग** 1 (SNS) शुश्रूषा अधिक्षिका | 1 | 1 | 0 |
| 2 | **वर्ग** **2**(Metron) | | | |
| | अधिसेविका वर्ग 2 श्रेणी 1 | 18 | 1 | 17 |
| | अधिसेविका वर्ग 2 श्रेणी 2 | 28 | 12 | 16 |
| | **एकूण** | **46** | **13** | **33** |
| 3 | **वर्ग** 3 | | | |
| | सहायक अधिसेविका | 66 | 22 | 44 |
| | विभागीय परिसेविका | 187 | 52 | 135 |
| | परिसेविका | 1420 | 903 | 517 |
| | सार्व.आरोग्य परिसेविका | 98 | 98 | 0 |
| | मनोरुग्ण परिसेविका | 52 | 52 | 0 |
| | बालरुग्ण परिसेविका | 52 | 52 | 0 |
| | अधिपरिचारिका (Staff Nurse) | 11665 | 7996 | 3669 |
| | **एकूण** | **13540** | **9175** | **4365** |
| | **एकूण (वर्ग** 1 + 2+3) | **13587** | **9189** | **4398** |

## सद्य:स्थितीत परिचर्या कार्यासनात सुरु असलेली महत्वाचे कामकाज :-



- **परिचारिका संवर्गातील सर्व स्तरावरील (शैक्षणिक व शुश्रूषा विभागातील) पदभरती** :-
- (अ) प्राध्यापक-नि-प्राचार्य, प्राध्यापक-नि-उपप्राचार्य, सहयोगी प्राध्यापक हीसरळसेवेने भरावयाची पदे नव्याने निर्माण करण्यात आली असून त्यानुषंगाने सुधारीत सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करून सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आले असता, सामान्य प्रशासन विभागाने त्यामध्ये सुधारणा करुन सुधारित सेवाप्रवेश नियमास मान्यता दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनांनुसार सेवाप्रवेश नियम सुधारित करुन नस्ती विधी व न्याय विभागास सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
- (ब) सहायक प्राध्यापक या संवर्गामधील पदोन्नतीची सर्व 10 पदे भरण्यात आली आहेत. सदर संवर्गातील सरळसेवेच्या मंजूर 9 पदांपैकी १ पद भरलेले आहे. उर्वरित ८ पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
- (क) गट क संवर्गामधील अधिपरिचारिका हे पद 100 टक्के सरळसेवेने भरण्यात येते. गट "क" संवर्गातील रिक्त पदे 100 टक्केच्या प्रमाणात सरळसेवेने भरण्यासाठी मंत्रीमंडळाच्या दिनांक 5.5.2021 च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सबब, परिचर्या संवर्गातील अधिपरिचारिका गट-क संवर्गामधील रिक्त असलेली 100 टक्के पदे भरण्यासाठी एजन्सी नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.
- (ड) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये तसेच आयुष संचालनालय येथील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे त्याचा परिणाम रुग्णसेवेवर, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच प्रशासकीय कामकाजावर होत असल्याने विविध संवर्गातील नियमित पदभरती होईपर्यंत एकूण 4445 इतक्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादेत पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याबाबत दिनांक 13.4.2022 च्या पत्रान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर पदांमध्ये अधिपरिचारिकांच्या 1796 पदांचाही समावेश आहे.

- २) **<u>केंद्र शासनाप्रमाणे सर्व परिचारीकांना नर्सिंग भत्ता रु.7200/- प्रति महिना नव्याने मंजूर करुन देण्याबाबत :-</u>**
- कोरोना - 19 महामारीमध्ये परिचारीका कर्तव्य बजावत असताना घ्यावयाच्या जोखमीबाबत परिचारिकांनी जोखीम भत्ता रु. 7200/- मंजूर करण्याबाबतची मागणी केलेली आहे. याबाबत वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन नस्ती वित्त विभागाकडे पाठविण्यात आली असता या प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे वित्त विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. त्या अनुषंगाने आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
- ३) **<u>केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामामध्ये बदल :-</u>**
- परिचारिकांच्या पदनामात बदल करणेबाबत शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला होता. प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संचालक कार्यालयास कळविण्यात आले आहे.

- ४) **<u>परिचर्या महाविद्यालयांचा आकृतीबंध सुधारित करणे</u>** :-

विभागाच्या आकृतीबंधामध्ये केवळ परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या संस्थेतील मंजूर पदांचा समावेश आहे. इतर शिक्षण संस्थांमध्ये विविध शासन निर्णयान्वये पदे मंजूर करण्यात आली आहेत.काही परिचर्या महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक व अशैक्षणिक पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तर काही महाविद्यालयांमध्ये केवळ शैक्षणिक पदे मंजूर आहेत. सर्व परिचर्या महाविद्यालयातील पदांचा आराखडा एकसमान असणे आवश्यक असल्यामुळे भारतीय उपचर्या परिषदेच्या (INC) मानकानुसार पदांचा आढावा घेऊन सर्व परिचर्या शिक्षण संस्थांचा एकत्रित आकृतीबंध निर्माण करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

- ५) **<u>शासकीय रुग्णालयातील परिचर्या संवर्गाचा आढावा</u>** :- शासकीय रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या विचारात घेता भारतीय उपचर्या परिषदेच्या (INC) मानकानुसार विभागनिहाय विविध संस्थांमधील परिचर्या संवर्गातील पदांचा आढावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

# शिक्षण-1



- आरोग्य विज्ञान शाखेतील नवीन पदविका / पदवी अभ्यासक्रमांना तसेच अशा अभ्यासक्रमांच्या नवीन महाविद्यालयांना परवानगी/ मान्यता देणे.
- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे आस्थापना विषयक कामकाज हाताळणे.
- खाजगी महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवणे.
- खाजगी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारी / मागण्यांबाबत.
- कस्तुरबा हेल्थ सोसायटी सेवाग्राम, वर्धा यांना अनुदान वितरीत करणे.
- शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील रुग्णखाटांचे खाजगी संस्थांना संलग्नीकरणास मान्यता देणे.

- सार्वजनिक-खासगी भागीदार (पीपीपी) धोरण शासन निर्णय दि. २३ सप्टेंबर २०२१ नुसार निश्चित करण्यात आले.
- या धोरणात वैद्यकीय महाविद्यालये आणि अतिविशोपचार रुग्णालये यांच्या निर्मिती आणि विस्तारासाठी खाजगी वित्तीय पुढाकार (पीएफआय) आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीसाठी (पीपीपी) प्रत्येकी तीन मॉडेल समाविष्ट आहेत.
- आंतरराष्ट्रीय वित्त संस्था (IFC) सोबत आर्थिक आणि सल्लागार सेवा करार (FASA) दि.28 सप्टेंबर 2021 रोजी करण्यात आला.
- वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रकल्पांना आशियाई विकास बँकेमार्फत 500 दशलक्ष डॉलरचे अर्थसहाय्य मिळणेबाबत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

# महाराष्ट्रातील अभ्यासक्रम आणि महाविद्यालयांमधील वैद्यकीय शिक्षणाची सद्यस्थिती



| अभ्यासक्रम | शासकीय महाविद्यालये | प्रवेश क्षमता | खाजगी महाविद्यालये | प्रवेश क्षमता | एकूण महाविद्यालये | एकूण प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| एम.बी.बी.एस. | 28 (कॉर्पोरेशन सह) | 4650 | 20 | 2820 | 48 | 7470 |
| बी.डी.एस. | 4 | 326 | 25 | 2400 | 29 | 2726 |
| बी.ए.एम.एस. | 21 | 1737 | 59 | 4130 | 80 | 5867 |
| बी.एच.एम.एस. | 0 | 0 | 52 | 4215 | 52 | 4215 |
| बी.यु.एम.एस. | 3 | 180 | 4 | 230 | 7 | 410 |
| बी.पी.टी.एच | 4 | 90 | 69 | 3470 | 73 | 3560 |
| बी.ओ.टी.एच. | 4 | 9 | 0 | 0 | 4 | 90 |
| बी.ए.एस.एल.पी. | 2 | 25 | 0 | 0 | 2 | 25 |
| बी.पी. ॲन्ड ओ. | 1 | 8 | 0 | 0 | 1 | 8 |
| बी.एस्सी. नर्सिंग | 5 | 250 | 118 | 5610 | 123 | 5860 |
| **एकूण** | **72** | **7275** | **347** | **22875** | **419** | **30231** |

# भविष्यातील प्रमुख प्रकल्प



**प्रस्तावित पदव्युत्तर व अतिविशेषोपचार रूग्णालय**

- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे "महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था" दिनांक 05/04/2021 रोजी शासन निर्णय निर्गमित
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिविशेषोपचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था, नागपूर; दिनांक 13/10/2021 रोजी शासन निर्णय निर्गमित
- सेंट जॉर्जेस पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था, मुंबई

**प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये** -

- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद ; दिनांक 27/01/2021 रोजी शासन निर्णय निर्गमित
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी; दिनांक 28/03/2022 रोजी शासन निर्णय निर्गमित
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी; दिनांक 02/09/2022 रोजी शासन निर्णय निर्गमित
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक; दिनांक 05/04/2021 रोजी शासन निर्णय निर्गमित
- उर्वरीत 12 जिल्ह्यांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे (गडचिरोली, भंडारा, वाशिम, बुलढाणा, अमरावती, वर्धा, हिंगोली, जालना, अहमदनगर, पालघर,मुंबई उपनगर व अंबरनाथ/ ठाणे )

# शिक्षण-2



- **वैद्यकीय शिक्षण धोरण**
- ➢ विविध आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेश नियम तयार करून अधिसूचित करणे.
- ➢ आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसाठी नियम पुस्तिका अंतिम करणे.
- ➢ आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम प्रवेश क्षमतेत वाढ करणे.
- ➢ पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता नविन जागा निर्माण करणे व प्रवेश क्षमतेत वाढ करणे.
- **शिष्यवृत्ती योजना**
- विविध आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्ती योजनांचा लाभ देण्यात येतो.
- ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना
- ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
- ➢ शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना (SEBC & EWS )
- **विद्यावेतन**
- ➢ राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील आणि शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील आंतरवासिता प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतनाशी संबधित बाबी.
- ➢ वैद्यकीय/दंत/आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन विषयक बाबी.
- **सामाजिक दायित्व सेवा**
- ➢ सामाजिक दायित्व सेवेच्या अनुषंगाने धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे.
- एम.बी.बी.एस./पी.जी. डीप्लोमा-1 वर्ष
- एम.डी./एम.एस.- 1 वर्ष
- डी.एम./एम.सी.एच.- 2 वर्ष

- **इतर विषय**
  - वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी संदर्भात कार्यवाही करणे.
  - विद्यार्थ्यांचे महाविद्यालय बदलीच्या अनुषंगाने नियम तयार करणे.
  - महाराष्ट्र ॲनाटॉमी ॲक्ट अंतर्गत संस्थाना मान्यता देणे.
- **पी.जी. अभ्यासक्रम सद्य:स्थिती**
  - शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जवळपास 1514 जागा उपलब्ध आहेत.
  - शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये राज्यातील 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या 263 अतिरिक्त जागा निर्माण करण्याच्या अनुषंगाने आवश्यकता प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत.
  - मागील वर्षी निर्गमित प्रमाणपत्रास अनुसरुन चालू शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एकूण 335 इतक्या वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागाना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून मंजूरी प्राप्त झालेली आहे.
- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी (सेवांतर्गत उमेदवार) यांच्यासाठी 20% आरक्षण ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे

# लेखा व दक्षता



**<u>लेखा व दक्षता शाखा कामकाज</u>**

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, आयुर्वेदिक रुग्णालये, अन्न व औषध प्रशासन यांचे लेखाविषयक तपासणी करणे, निरीक्षण अहवाल तयार करुन तो संबंधित कार्यासनांना पाठविणे व त्यावर कार्यवाही होईल या दृष्टीने पाठपुरावा करणे.
२) लोकलेखा समिती, अंदाज समिती व भारताचे लेखानियंत्रक इत्यादी अहवालातील लेखा आक्षेप व इतर लेखा विषयक बाबींचा पाठपुरावा व समन्वय साधणे.
३) विभागातील शासकीय/अशासकीय सर्व लेख्यांच्या नोंदी ठेवणे.
४) विनियोजन लेख्या संदर्भात महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेल्या आक्षेपासंदर्भात संबंधित संस्थांना कळवून त्यांच्याकडून अनुपालन प्राप्त करुन घेवून महालेखापाल कार्यालयाकडे संमतीसाठी (Vetting) पाठवणे.

**<u>शाखेत सध्या सुरु असलेले महत्वाचे काम:-</u>**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत प्राप्त रक्कम रु. १४९.५५ कोटी पुरवणी मागणीच्या अनुषंगाने लेखापरिक्षणाचे व त्या संबंधी अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

# प्रशासन-1



- विभागाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये तसेच संलग्नित संस्थाच्या बांधकामासाठी आणि यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीसाठी राज्य योजनेच्या संबंधित लेखाशीर्षात निधी अर्थसंकल्पित करणे. तसेच सदर लेखाशीर्षात अर्थसंकल्पित निधीतून बांधकाम, यंत्रसामुग्री-साधनसामुग्री या विषयक बाबींच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरीसह निधी उपलब्ध करुन देणे.
- बांधकामामध्ये प्रामुख्याने (53-मोठी बांधकामे) व (27-लहान बांधकामे) यांचा समावेश होतो.
- मोठी बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अथवा केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम कंपनीव्दारे हाती घेण्यात येतात. त्याकरीता स्वतंत्र लेखाशीर्षे निर्माण करण्यात आलेली आहेत.
- यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसाठी आवश्यक असणारा निधी हाफकीन महामंडळाकडे वर्ग करण्यात येतो. त्यानुषंगाने हाफकीन महामंडळ स्तरावर यंत्रसामुग्री-साधनसामुग्री खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविली जाते.
- महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे यांच्या प्रशासकीय बाबी

# अनिवार्य खर्चाची प्रमुख उद्दिष्टे



- 27-**लहान बांधकामे**

विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांच्या इमारती 30 ते 40 वर्षे जुन्या असल्याने त्यांची देखभाल व दुरुस्ती वेळेवर करणे गरजेचे असते. सदर इमारतींची वेळोवेळी दुरुस्ती व डागडुजी झाली नाही तर इमारतींमध्ये पडझड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता आहे. याबाबीचा विपरीत परिणाम रुग्णसेवेवर होऊ शकतो.

सदर अनिवार्य खर्चाच्या उद्दिष्टांतर्गत संस्थांच्या किरकोळ बांधकाम व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन दिला जातो.

- 72-**यंत्रसामुग्री व उपकरणे यांची देखभाल व दुरुस्ती**

विभागाच्या नियंत्रणाखालील विविध संस्थांमधील उपलब्ध यंत्रसामग्री व साधनसामुग्री सुरळीत सुरु ठेवण्याच्या दृष्टीने त्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते.

सदर अनिवार्य खर्चाच्या उद्दिष्टांतर्गत यंत्रसामुग्रीच्या वार्षिक देखभाल-दुरुस्तीच्या कामांकरीता (AMC/ CMC) निधी उपलब्ध करुन दिला जातो.

** **सदर दोन्ही उद्दिष्टात विभागास दरवर्षी मागणी पेक्षा कमी प्रमाणात निधी उपलब्ध होत असतो.**

# अर्थसंकल्पित निधी (बांधकामे)



- बांधकामांशी संबंधित काही प्रमुख लेखाशीर्षात सन 2022-23 या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पित निधीचा तपशील:-

| संस्था | लेखाशीर्ष | अर्थसंकल्पित निधी |
|---|---|---|
| वैद्यकीय महाविद्यालये व आरोग्य पथके | मागणी क्र.एच-08, 4210 0041 (53-मोठी बांधकामे) | 358.3838 कोटी |
| दंत महाविद्यालये | मागणी क्र.एच-08, 4210 1745 (53-मोठी बांधकामे) | 15.00 कोटी |
| संचालनालय | मागणी क्र.एच-08, 4210 1736 (53-मोठी बांधकामे) | 1.5 कोटी |
| जे.जे.अतिविशेषोपचार रुग्णालय | मागणी क्र.एच-08, 4210 2752 (53-मोठी बांधकामे) | 43.48 कोटी |
| टर्न की तत्वावरील बांधकामे | मागणी क्र.एस-04, 4210 2625 | 600.00 कोटी |

# अर्थसंकल्पित निधी (यंत्रसामुग्री-साधनसामुग्री)



- यंत्रसामुग्री-साधनसामुग्रीशी संबंधित प्रमुख लेखाशीर्षात सन 2022-23 या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पित निधीचा तपशील:-

| संस्था | लेखाशीर्ष | अर्थसंकल्पित निधी |
|---|---|---|
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये | मागणी क्र.एस-04, 4210 1629 (52- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री) | 234.90 कोटी |
| शासकीय दंत महाविद्यालये व रुग्णालये | मागणी क्र.एस-04, 4210 1727 (52- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री) | 5.00 कोटी |

# नवीन शासकीय महाविद्यालये व बांधकामांची सद्यस्थिती



| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रशासकीय मान्यतेचा तपशील | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| 1. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर | शा.नि. दिनांक 06/04/2016 535.87 कोटी | मे.एच.एस.सी.सी. इंडिया लिमिटेड | 65 टक्के बांधकाम पूर्ण |
| 2. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया | शा.नि. दिनांक 15/07/2021 689.46 कोटी | मे.इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स इंडिया लिमिटेड | विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे सुरु आहे. |
| 3. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव | शा.नि. दिनांक 10/05/2018 192.00 कोटी<br>शा.नि. दिनांक 02/07/2018 267.00 कोटी<br>एकूण 459.00 कोटी | मे.एच.एस.सी.सी. इंडिया लिमिटेड | मा. मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 06/09/2022 व दिनांक 23/09/2022 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत प्राप्त निर्देशांनुसार, जळगांव संस्थेच्या बांधकामास पुढील शासन आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. |
| 4. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार | शा.नि. दिनांक 15/07/2021 532.41 कोटी | मे.इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स इंडिया लि. | विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे सुरु आहे. |

# नवीन शासकीय महाविद्यालये व बांधकामांची सद्यस्थिती



| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रशासकीय मान्यतेचा तपशील | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| 5. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा | शा.नि. दिनांक 12/04/2021 495.46 कोटी | सार्वजनिक बांधकाम विभाग | कंत्राटदार नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. |
| 6. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग | शा.नि. दिनांक 14/07/2021 406.96 कोटी | मे.इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स इंडिया लिमिटेड | विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे सुरु आहे. |
| 7. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदूर्ग | शा.नि. दिनांक 12/04/2021 427.5699 कोटी | सार्वजनिक बांधकाम विभाग | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. |
| 8. | कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद | शा.नि. दिनांक 08/08/2019 38.75 कोटी | मे.एच.एस.सी.सी. इंडिया लिमिटेड | 75 टक्के बांधकाम पूर्ण |
| 9. | जे.जे.अतिविशेषोपचार रुग्णालय | शा.नि. दिनांक 05/02/2019 778.652 कोटी | सार्वजनिक बांधकाम विभाग | 16 टक्के बांधकाम पूर्ण |
| 10. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील नवीन बाह्यरुग्ण विभाग | शा.नि. दिनांक 05/03/2021 73.29 कोटी | मे.इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स इंडिया लिमिटेड | जुनी ओपीडी पाडण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

# विचाराधीन असलेले काही प्रमुख प्रकल्प



- केंद्र शासनाच्या Up gradation of existing state government/central government medical college to increase MBBS seats in country योजनेंतर्गत राज्यातील एकूण 15 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी प्रतिसंस्था केंद्र हिस्सा 36 कोटी प्रमाणे 540 कोटी निधी प्राप्त होणार आहे. त्यास समरुप राज्य हिस्सा प्रतिसंस्था 24 कोटी प्रमाणे 360 कोटी निधी दायित्व स्वीकारण्यास मंजूरी. शासन निर्णय दिनांक 12/08/2022. तसेच प्रतिसंस्था प्रतिवर्षी येणारा 5.79 कोटी प्रमाणे 86.85 कोटी आवर्ती खर्चास मंजूरी. या योजनेंतर्गत केंद्र शासनाशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. याबाबत संचालनालय स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

# विचाराधीन असलेले काही प्रमुख प्रकल्प



- प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये Integrated academic cum residential building बांधकामाचा रुपये 704.67 कोटी किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर निधी PMJVK योजनेच्या माध्यमातून प्राप्त करुन घेण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
- JHPIEGO संस्थेच्या सहयोगाने USAID RISE प्रकल्पाच्या माध्यमातून विभागाच्या नियंत्रणाखालील इंदिरा गांधी शा.वै.म., नागपूर, ग्रँट शा.वै.म., मुंबई, शा.वै.म., औरंगाबाद या संस्थांमध्ये कौशल्य प्रशिक्षणाकरीता सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यासाठी JHPIEGO संस्थेस स्थळ पाहणी करण्यास व तद्नंतर आवश्यक अंदाजपत्रक सादर करण्यास मंजूरी दिलेली आहे. (प्रथम ज.जी.रूग्णालय येथे चाचणी)

# प्रशा-२



- रुग्णालयीन व्यवस्थापनासंदर्भातील धोरणात्मक बाबी.
- औषधे, सर्जिकल्स साहित्य व तदनुषंगिक बाबींची खरेदी हाफकिन महामंडळामार्फत करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे.
- 02-मजूरी, 06-दुरध्वनी वीजपाणी, 10-कंत्राटी सेवा, 13-कार्यालयीन खर्च, 14-भाडेपट्टी व कर, 19-आहार खर्च, 21- सामुग्री व पुरवठा, 26- जाहिराती व प्रसिद्धी, 30- एचएमआयएस या उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पीय निधी मंजूर करुन घेणे, निधी वितरण, पुरवणी मागण्या सादर करणे.
- वरील विषयासंदर्भातील एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित असलेल्या खरेदी देयके अदा करण्यासाठी अन्वेषण प्रमाणपत्र देणे.
- बाह्यस्त्रोतामार्फत संस्थांमध्ये साफसफाई, रुग्णालयीन आहार, लॉन्ड्री इत्यादी कामे, तसेच कंत्राटी तत्वावर वर्ग-4 ची पदे व सुरक्षा रक्षकांची पदे उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देणे.
- संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांची नावे बदलण्यास परवानगी देणे.
- संस्थांच्या वापरासाठी इमारती भाडे तत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी परवानगी.

- संस्थांना आवश्यक असणा-या जागांबाबतचे प्रस्ताव/विषय, विविध तक्रारींची प्राथमिक चौकशी करणे.
- जन औषधी केंद्रे सुरु करण्यासाठी मान्यता देणे, सिकलसेल या कार्यक्रमाशी संबंधित कामकाज.
- कोविड कालावधीत जिनोम सिक्वेन्सिंग प्रकल्पाबाबत कार्यवाही,क्लिनिकल ट्रायल्सना परवानगी देणे.
- एच.एम.आय.एस. प्रकल्पासंबंधित कामकाज (सध्या प्रशा-1 कार्यासनामार्फत हाताळण्यात येत आहे.)
- महात्मा फुले जन आरोग्य योजनेशी संबंधित कामे, रुग्णालय शुल्क वाढविणे, देणग्या स्विकारणे, रुग्णालयाचा दर्जा सुधारणे इ. प्रकरणे.
- सार्वजनिक आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण या दोन्ही विभागाच्या सामाईक कार्यक्रमांवर कार्यवाही करणे.
- या कार्यासनाशी संबंधित लोकलेखा समितीचे व महालेखाकार कार्यालयाच्या परिच्छेदांवर कार्यवाही करणे.
- वरील विषयासंदर्भात उपस्थित होणा-या विधानमंडळ आयुधांवर (तारांकित/अतारांकित प्रश्न/लक्षवेधी सूचना/कपात सूचना/अर्धा तास चर्चा/औचित्याची मुद्दे) कार्यवाही केली जाते.

- **प्रशासन-2 कार्यासनातील उद्दिष्ठनिहाय सन 2022-23 वर्षासाठी मंजूर निधी**

| सन 2022-23 मध्ये मंजूर निधी (हजारात) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उद्दिष्ट** | **नाव** | **मागणी** | **अर्थसंकल्पीत** | **पुरवणी मागणी जुलै** | **एकूण मंजूर** | **एकूण मंजूर कोटीत** |
| 2 | मजुरी | 49425 | 17542 | 0 | 17542 | 1.75 |
| 6 | दुरध्वनी वीजपाणी | 266390 | 1095903 | 0 | 1095903 | 109.59 |
| 10 | कंत्राटी सेवा | 4010444 | 2848900 | 871367 | 3720267 | 372.02 |
| 13 | कार्यालयीन खर्च | 1433443 | 588758 | 0 | 588758 | 58.87 |
| 14 | भाडेपट्टी व कर | 295296 | 115876 | 0 | 115876 | 11.59 |
| 19 | आहार खर्च | 292283 | 152750 | 44692 | 197442 | 19.74 |
| 21 | सामुग्री व पुरवठा | 4770720 | 1707012 | 0 | 1707012 | 170.7 |
| 26 | जाहिराती व प्रसिद्धी | 16885 | 7887 | 0 | 7887 | 78.87 LAKH |
| 30 | एच एम आय एस | 0 | 800000 | 0 | 800000 | 80 |

# समन्वय



- विभागात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार प्राप्त होणाऱ्या अर्जांचे संकलन करणे, त्याची नोंदवही अद्यावत ठेवणे.
- अन्य मंत्रालयीन विभागांना पाठवावयाच्या माहितीचे संकलन.
- विधीमंडळ कामकाजाचे समन्वय.
- विभागाशी संबंधित संकिर्ण स्वरुपाच्या बाबी.

# आयु-१



- **आयुष संचालनालय अंतर्गत शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथीक महाविद्यालये व रुग्णालये, सहाय्यक संचालक आयुष कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्याशी संबंधीत सेवाविषयक बाबींचे प्रस्ताव आयु-१ कार्यासना मार्फत हाताळले जातात**

# आयु-2



- खाजगी शासन अनुदानित १६ आयुर्वेदिक व ३ युनानी महाविद्यालये / संलग्नित रुग्णालय / संस्था यांचेशी संबंधित सर्व सेवा विषयक बाबी, पदनिर्मिती व धोरणात्मक बाबी, अनुदान मंजूर करण्याचे प्रस्ताव.
- खाजगी शासन अनुदानित १६ आयुर्वेदिक व ३ युनानी महाविद्यालये / संलग्नित रुग्णालय / संस्था येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्या.
- आयुर्वेद प्रचार व संशोधन, नवीन योजना, राज्य व केंद्र पुरस्कृत योजना.
- शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलंग्नित रुग्णालये तसेच शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सर्व अर्थसंकल्पीय बाबी / बांधकामविषयी अर्थसंकल्पीय बाबी.
- नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय तसेच शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालय यांचे अनुषंगिक बांधकामविषयी बाबी.

# अधिनियम



- अधिनियम या कार्यासनामार्फत वैद्यकीय व्यवसायी, परावैद्यकीय तंत्रज्ञ, परिचारिका, औषध व्यवसायी या संदर्भात खालील 10 परिषदांचे कामकाज हाताळण्यात येते.

| | |
|---|---|
| 1) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, | 6) महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी परिषद |
| 2) महाराष्ट्र राज्य, व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, | 7) महाराष्ट्र परावैद्यकीय परिषद |
| 3) महाराष्ट्र राज्य औषध व्यवसायी परिषद, | 8) महाराष्ट्र परिचर्या परिषद |
| 4) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, | 9) महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, |
| 5) महाराष्ट्र दंत परिषद, | 10) महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद |

- उपरोक्त परिषदांचे कामकाज चालविण्यासाठी अधिनियम व नियम तयार करणे त्यात वेळोवेळी दुरूस्त्या करणे याबाबतचे कामकाजही हाताळण्यात येते. सदर अधिनियम/नियम खालीलप्रमाणे आहे

- महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, 1965 व नियम, 1967.
- केंद्र शासनाचा दंतवैद्यक अधिनियम, 1948 व नियम, 1951.
- महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961.
- केंद्र शासनाचा औषध व्यवसाय अधिनियम, 1948 व नियम, 1969
- महाराष्ट्र होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1959.
- महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, 2011 व नियम, 2019.
- महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, 1966 व नियम, 1971.
- महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम, 2015 व नियम, 2019
- महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भोतिकोपचार परिषद अधिनियम, 2002
- महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, 2013

- मानवी अवयव व उती प्रत्यारोपणासाठी राज्य प्राधिकार समितीच्या आदेशाविरुध्द दाखल करण्यात येणाऱ्या अपीलांची सुनावणीचे कामकाज.
- बोगस डॉक्टरांवरील कारवाईचे कामकाज.
- खाजगी वैद्‌यकीय व्यवसायींकडून वैद्‌यकीय उपचारामध्ये होणाऱ्या हलगर्जीपणाच्या अनुषंगाने संबंधींतावर कारवाई करण्याचे कामकाज.

# औषधे-1



**औषधे**-1 **कार्यासनाव्दारे**

1) अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनाविषयक बाबी,

2) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित,मुंबई यांच्याशी संबंधित सर्व बाबी

3) व हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांचेशी संबंधित सर्व बाबी हाताळल्या जातात.

- **अन्न व औषध प्रशासनात सद्यस्थितीत** 1271 **पदे मंजुर आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदाचा गट | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | गट-अ | 191 | 102 | 89 |
| 2 | गट-ब | 605 | 290 | 315 |
| 3 | गट-क | 357 | 253 | 104 |
| 4 | गट-ड | 118 | 118 | 00 |
| | एकुण | 1271 | 763 | 508 |

## आ. हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित,मुंबई

- हाफकिन मंहामंडळाची स्थापना सन 1975 मध्ये कंपनी कायद्याव्दारे करण्यात आलेली आहे. महामंडळाव्दारे पोलीओ व अन्य लसीची तसेच विविध औषधांची निर्मिती करण्यात येते.
- केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या संयुक्त भागीदारीतुन महामंडळाच्या आवारात कोव्हॅक्सीन लस निर्मितीचा प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई

- हाफकिन संस्था ही स्वायत्त संस्था असुन संस्थेमध्ये विविध विषयावरील संशोधनाचे काम पार पाडले जाते.

# औषधे-२



- आयुक्त, अन्न व औषध प्रशासनाच्या प्रशासकीय बाबी.
- आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्याकडील अर्थसंकल्पीय कामकाज.
- आयुक्त, अन्न व औषध प्रशासनाच्या आदेशाविरुध्द मा.मंत्री/राज्यमंत्री यांचेकडे करण्यात. येणाऱ्या अपीलावर त्यांनी दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणे.
- आयुक्त, अन्न व औषध प्रशासनाच्या प्रशासकीय बाबी, अपिले, याचिका, बांधकामे इ.

# अलेप



1. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागासाठी सन 2022-23 या वर्षाकरीता रु. 6107.209 कोटी (अनिवार्य व योजना) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.
2. मागणी क्रमांक निहाय अर्थसंकल्पित निधी, वितरीत निधी व खर्च (अनिवार्य व योजना) पुढील प्रमाणे आहे:-

| अ.क्र. | मागणी क्र. | मुख्य लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत निधी | वितरीत निधी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एस-1 | 2210 | 5045.7280 | 2776.7910 | 2092.3490 |
| 2 | एस-2 | 2235 | 0.4000 | 0.0840 | 0.0420 |
| 3 | एस-3 | 2251 | 28.6118 | 11.4339 | 7.6748 |
| 4 | एस-3 | 2406 | 0.0002 | 0.0000 | 0.000 |
| 5 | एस-4 | 4210 | 1022.4680 | 396.8530 | 324.0000 |
| 6 | एस-5 | 7610 | 10.001 | 5.5860 | 1.4810 |
| | | **एकूण** | **6107.209** | **3190.7479** | **2425.5468** |

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागासाठी वार्षिक योजनेंतर्गत उपक्षेत्र निहाय व मागणी क्रमांक निहाय अर्थसंकल्पित निधी खालील प्रमाणे:

| अ. क्र. | उपक्षेत्र | एच-8 | एच-6 | एस-4 | एस-3 | एस-1 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (खुद्द) | 0.000 | 0.000 | 0.000 | 10.020 | 0.000 | 10.020 |
| 2 | संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | 532.624 | 2.500 | 981.300 | 0.000 | 266.952 | 1783.377 |
| 3 | अन्न व औषध प्रशासन, (म.रा.) | 67.144 | 0.000 | 31.228 | 0.000 | 17.975 | 116.346 |
| 4 | आयुष संचालनालय, मुंबई | 92.985 | 1.001 | 9.940 | 0.000 | 0.045 | 103.971 |
| 5 | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 50.000 | 50.000 |
| 6 | महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे | 0.000 | 0.380 | 0.000 | 0.000 | 0.060 | 0.440 |
| | **एकूण** | **692.753** | **3.881** | **1022.468** | **10.020** | **335.032** | **2064.154** |

एच-8 (मोठी बांधकामे), एच-6 (लहान बांधकामे), एस-4 (यंत्र खरेदी व बांधकामे), एस-3 (ई-गव्हर्नन्स), एस-1 (योजनेंतर्गत काही वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये इत्यादी)

# विभागाच्या केंद्र पुरस्कृत योजनांची माहिती:



| अ. क्र. | केंद्र पुरस्कृत योजनेचे नाव | योजना | राज्य हिस्सा (40 टक्के) | केंद्र हिस्सा (60 टक्के) |
|---|---|---|---|---|
| 1 | Tertiary Care Programme | National Programme for Prevention and Control of Cancer, Diabetes, Cardiovascular Diseases and Stroke | 4210 2592 | 4210 2581 |
| | | | (52- रु.1,000) | (52- रु.1,000) |
| | | | (53-रु.8.00 कोटी) | (53-रु.1,000) |
| 2 | Human Resources & Medical Education | Establishment of New Medical Colleges attached with existing District/ Referral Hospitals (Govt.Medical College,Gondia) | 53-Major Works: Rs.22,69,50,000/- | 53-Major Works: Rs. 40,00,00,000/- |
| | | | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.3,71,13,000/- | |
| | | | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.29,37,000/- | |
| | | Establishment of New medical Colleges Attached with Existing District / Referral Hospitals - Phase -III, Nandurbar | 52-Machinery and Equipment: Rs. 670,00,000/- | 52-Machinery and Equipment:Rs 2,00,00,000/- |
| | | | 53-Major Works: Rs.20,00,00,000/- | 53-Major Work: Rs38,00,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | | Strengthining of Food and Drug Administration and Establishment of Food and Drug Testing Laboratories Major Works | 53-Major Works: Rs18,29,57,000/- | 53-Major Works: Rs.27,44,35,000/- |
| | | | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.2,54,30,000/- | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.3,81,46,000/- |
| | | | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.20,13,000/- | 63-INTER ACCOUNT TRANSFER: Rs.30,19,000/- |
| 4 | | Strenthening of Food & Drug Administration and Establishment of Food and Drug Testing Laboratories | 31 - GRANT IN AID (NON SALARY): Rs.5,87,42,000/- | 31 - GRANT IN AID (NON SALARY): Rs. 8,81,14,000/- |

**ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत वित्तीय वर्ष सन 2022-23 मध्ये रु.10.00 कोटी (17, संगणक खर्च - रु.3.00 कोटी व 50, इतर खर्च - रु.7.00 कोटी) इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत खालील प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत अथवा प्रस्तावित आहेत.**



a. खुद्द विभागासाठी 25 संगणक व 27 प्रिंटर्स खरेदी करण्यात आले आहेत - रु. 28,29,200/-
b. वैद्यकीय शिक्षण संचालनालयात आय.टी. प्रकल्प राबविण्याकरीता राज्य शासनाने निवडलेल्या संस्थांमधून M/s Grant Thornton Bharat LLP या सल्लागार संस्थेची नियुक्त करण्यात आली आहे. त्याकरीता या वित्तीय वर्षात रु.1,80,00,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.
c. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्थ (अ) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, (आ) हाफकिन, संशोधन व चाचणी संस्था तसेच (इ) शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालये आणि रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या प्रदानासाठी विकसित करण्यात आलेल्या "आयुर्वेदार्थ कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणाली"च्या देखभालीसाठी M/s. Maharashtra Information Technology Corporation Ltd, Mumbai रु.87,96,923/- इतका खर्च अपेक्षित आहे.
d. शासकीय वैद्यकीय आणि आयुर्वेदिक महाविद्यालये व रूग्णालयांमध्ये कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन प्रदानासाठी महाआयटीमार्फत (Maharashtra Information Technology Corporation Ltd, Mumbai) स्वतंत्र कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणाली विकसित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्याकरीता रु.13,83,696/- इतका खर्च प्रस्तावित आहे.
e. वै.शि.व औ.द्र.विभाग व विभागाच्या अधिनस्थ कार्यालयांसाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन नवीन संकेतस्थळे तयार करण्याच्या रु.3.00 कोटी इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

# नोंदणी शाखा



१) स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सुचनांनुसार कार्यालयीन बैठक व्यवस्था, स्वच्छता व नीटनीटकेपणा, निंदणीकरण, इ. बाबीसंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

२) याकरीता विभागातील निरुपयोगी साहित्य सामुग्री, संगणकीय साहित्य, इ.ची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

३) ई-ऑफीसचा वापर मंत्रालयीन प्रशासकीय विभागातून विभागात येणाऱ्या व विभागातून पाठविण्यात येणाऱ्या नस्त्या/संदर्भांची नोंद घेण्यास्तव करण्यात येत आहे.

४) विभागात २ झेरॉक्स मशीन, १ स्टाफ कार भाडेतत्वावर घेण्यात आली आहे. मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन आणि विभागाचे सचिव यांच्या वापराकरीता विभागाची स्वत:ची एकूण 2 वाहने आहेत.

५) दूरध्वनी यंत्रणा अद्ययावत करण्यात आली असून एमटीएनएलची ISDN-PRi लाईनची सेवा घेण्यात आली आहे.

# रोखशाखा



१) या विभागातील कार्यरत एकूण 94 कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करण्यात आली असून त्याचे डीजीटायझेशन करण्यास्तव सर्व सेवापुस्तके स्कॅन करण्यात आली आहेत.

२) ई-एचआरएमएस- मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीचा वापर करण्यास्तव सदर प्रणालीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांची माहिती भरण्यात आली आहे. त्याअंतर्गत ई-लिव्ह तात्काळ सुरु करण्याची कार्यवाही आस्थापना शाखेच्या मदतीने करण्यात येत आहे.

३) विभागातील एकूण 94 अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनाकरीता आतापर्यंत एकूण रु.13,62,01,000/- इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून रु.6,18,09,683/- इतकी रक्कम खर्च झाली आहे.

# विधी कक्ष



- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात 01 अवर सचिव (विधी) हे पद मंजूर असून सद्यस्थितीत सदर पद रिक्त आहे.

# धन्यवाद